
दैनिक
www.sahyandrinews.com
# सह्याद्रीचा राखणदार
• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •
• (महाराष्ट्र) वर्ष ०२ • १९९ • RNI : MAHMAR/2023/87818 • रविवार दि. २५ मे २०२५ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

Agro. Tourism & Adventure Park
कृषी पर्यटन व ॲडवेंचर पार्क

# मुख्यमंत्र्यांच्या मनात आले तर भुजबळ यांना तिसरा उपमुख्यमंत्रीही करतील

## पालकमंत्री पदावर कोणीही दावा करू शकतो-गिरीश महाजन यांचे विधान



**जळगाव (वृत्तसंस्था)राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे नेते छगन भुजबळ यांना नव्यानेच मंत्रिमंडळात स्थान देण्यात आले आहे. त्यानंतर आता नाशिकचे पालकमंत्रिपद त्यांच्याकडेच दिले जाईल अशी राजकीय वर्तुळात चर्चा सुरू झाली आहे. यावर भाजपचे नेते व मंत्री गिरीश महाजन यांनी प्रतिक्रिया दिली आहे. मुख्यमंत्र्यांच्या मनात आले तर छगन भुजबळ यांना तिसरा उपमुख्यमंत्रीही करतील, असे विधान महाजन यांनी केले आहे.गिरीश महाजन यांना छगन भुजबळ हे नाशिकच्या पालकमंत्री पदावर दावा करू शकतात अशी चर्चा सुरू असल्याचे विचारले तेव्हा ते म्हणाले, पालकमंत्री पदावर कोणीही दावा करू शकतो. त्याला काहीच हरकत नाही. पण हा सर्वस्वी अधिकार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा आहे. त्यांनी जर मनात आणले तर भुजबळांना पालकमंत्री करतील. फडणवीस भुजबळांना तिसरे उपमुख्यमंत्रीही करू शकतात. या विधानाला नंतर सारवासारव करताना गिरीश महाजन म्हणाले, छगन भुजबळ यांनी असा कोणताही दावा केला नाही, उगाच अशा चर्चा करून तेल ओतू नका.**

● सह्याद्रीचा राखणदार

राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या नेत्या रोहिणी खडसे यांनी राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांनी त्यांचे कर्तव्य बजावले नाही.
त्यांच्याकडून योग्य तो प्रतिसाद कसपटे कुटुंबीयांना मिळाला नाही, अशी तक्रार करत मुख्यमंत्र्यांना पत्र पाठवले आहे. यावर बोलताना गिरीश महाजन म्हणाले, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस रोहिणी खडसे यांच्या पत्राचा विचार करतील, असे म्हटले आहे.वैष्णवी हगवणे आत्महत्या प्रकरणी राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकरांनी त्यांचे कर्तव्य बजावले नाही, त्यांच्याकडून योग्य तो प्रतिसाद कस्पटे कुटुंबीयांना मिळाला नाही अशी तक्रार करत राष्ट्रवादी शरद पवारांच्या पक्षाच्या महिला प्रदेशाध्यक्षा रोहिणी खडसे यांनी मुख्यमंत्र्यांना पत्र लिहिले. रुपाली चाकणकर यांना राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षपदावरून हटवण्यात यावं अशी मागणीही रोहिणी खडसे यांनी केली आहे.



# देशासाठी एकत्र येणे हीच खरी राष्ट्रसेवा आमदार करण देवतळे यांचे प्रतिपादन

## ऑपरेशन सिंदूरच्या शौर्याला वंदन करत वरोऱ्यात भव्य तिरंगा यात्रा संपन्न

● सह्याद्रीचा राखणदार

**वरोरा (प्रतिनिधी):**भारतीय सैन्याच्या ऑपरेशन सिंदूर या अभूतपूर्व कारवाईच्या यशाचा गौरव करण्यासाठी वरोरा शहरात आज(२४ मे) भव्य तिरंगा यात्रा उत्साहात पार पडली. शहीद योगेश डाहुले चौक येथून यात्रेची सुरुवात झाली आणि संपूर्ण वरोरा शहर देशभक्तीच्या रंगात रंगले. राष्ट्रभक्तीपर घोषणांनी आसमंत दुमदुमला होता.
या प्रसंगी आमदार करण संजय देवतळे यांनी उपस्थितांना उद्देशून बोलताना सांगितले, भारतीय जवानांनी देशाच्या रक्षणासाठी दाखवलेले शौर्य हे अमूल्य आहे. त्यांना मानवंदना देणे, त्यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त करणे, हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. देशासाठी एकत्र येणे हीच खरी राष्ट्रसेवा आहे, असे ते म्हणाले.




तिरंगा यात्रेमध्ये शहरातील विविध सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक संस्था, युवक व महिला मंडळे, राजकीय पक्षांचे प्रतिनिधी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. विशेष आकर्षण ठरलेला १२० फूट लांबीचा तिरंगा झेंडा उपस्थितांचे लक्ष वेधून घेत होता.
एअरबॉर्न ट्रेनिंग सेंटरचे प्रशिक्षणार्थी, आजी-माजी सैनिक संघटना, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे स्वयंसेवक, भाजपचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते यांची उत्स्फूर्त उपस्थिती ही यात्रेच्या यशस्वीतेचे प्रतीक ठरली.
या यात्रेचे आयोजन विश्व हिंदू परिषद व बजरंग दल, वरोरा यांच्या पुढाकाराने करण्यात आले होते. अनेकांनी हातात तिरंगा घेऊन शहरातून संचलन करत भारतीय सैन्याच्या शौर्याला सलाम केला.

# या नीचपणाला कठोर शिक्षा झालीच पाहिजे

## वैष्णवी हगवणे मृत्यू प्रकरणी उदय सामंतांची संतप्त

● सह्याद्रीचा राखणदार

**पुणे (वृत्तसंस्था)**-महाराष्ट्राचे उद्योगमंत्री व शिवसेना शिंदे गटाचे नेते उदय सामंत यांनी वैष्णवी हगवणे प्रकरणावर संतप्त प्रतिक्रिया दिली आहे. उदय सामंत यांनी वैष्णवीच्या वडिलांची तसेच काकांची भेट घेतली आहे, त्यांच्याशी संवाद साधला. त्यानंतर त्यांनी पत्रकारांशी संवाद साधताना वैष्णवी हगवणे मृत्यू प्रकरणावर संताप व्यक्त केला आहे. हा जो नीचपणा आहे त्याची कठोर शिक्षा झालीच पाहिजे, अशी प्रतिक्रिया त्यांनी दिली आहे.उदय सामंत म्हणाले, हा नीचपणाचा कहर आहे. पोलिस अधिकाऱ्यांशी देखील मी चर्चा केली आहे. तिघांना अटक केली आहे. दोन लोकांसाठी ६ पथके तयार करण्यात आली आहेत. पुढील २४ तासांत त्या दोघांना अटक करण्यात यश येईल. हा जो नीचपणा आहे त्याची कठोर शिक्षा झालीच पाहिजे. अशा पद्धतीचे धाडस कोणी भविष्यात करू नये, अशा पद्धतीची शिक्षा या पाच लोकांना झाली पाहिजे.
पुढे बोलताना उदय सामंत म्हणाले, सुदैव



एक आहे की जे बाळ आहे ते कसपटे कुटुंबाच्या ताब्यात पोलिसांनी दिले आहे. अशा गोष्टींचा परिणाम कायमस्वरूपी समाजावर होत असतो आणि म्हणून मी पोलिसांशी चर्चा केली की फक्त या पाच लोकांवर थांबू नका. अजून जे कोणी असेल याचा देखील तपास करावा. गायकवाड साहेबांशी देखील माझी चर्चा झाली आहे. यामुळे कसपटे परिवार समाधानी आहे. परंतु गेलेली जी व्यक्ती आहे ती परत येऊ शकत जरी नसली तरी भविष्यात या घरात जो आघात झाला आहे तो पुन्हा होऊ नये, याची दक्षता पोलिसांनी घेतली पाहिजे. शासन कुटुंबाच्या पाठीशी आहे. तसेच या नीचपणाला कठोर शिक्षा झालीच पाहिजे हीच आमची भूमिका आहे.
उदय सामंत म्हणाले, हा जो काही विषय आहे हा विकृतपणाचा कळस आहे. हा नीचपणाचा कळस आहे. अशा पद्धतीने एक वर्षात पैसे मिळाले नाहीत, गाडी मिळाली नाही, स्वतःला मोबाईल मिळाला नाही म्हणून अशा सुशिक्षित कुटुंबाने राजकारणात जगाचे कैवारी म्हणून फिरत असतात अशा लोकांनी अशा प्रकारचा अत्याचार करणे म्हणून मी हा शब्द वापरला की हा नीचपणाचा कळस आहे. या नीचपणाला शिक्षा झाली पाहिजे ही शासनाची भूमिका आहे.

# अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांना हेक्टरला दोन लाखांची नुकसान भरपाई द्यावी-आ.नारायण पाटील

● सह्याद्रीचा राखणदार

**सोलापूर (प्रतिनिधी):**करमाळा मतदार संघाचे आमदार नारायण आबा पाटील यांनी अवकाळी पावसामुळे नुकसान झालेल्या पिकांसाठी हेक्टरला दोन लाख रुपयांची नुकसानभरपाई देण्याची मागणी केली आहे.नारायण पाटील यांनी जिल्हाधिकारी यांना याबाबत लेखी निवेदन पाठवले असून, त्यांनी सांगितले की गेल्या दहा दिवसांत करमाळा तालुक्यात झालेल्या अवकाळी पावसाने कांदा, केळी, डाळिंब, द्राक्ष, आंबा तसेच भाजीपाला यांचा मोठा फटका बसला आहे. अनेक ठिकाणी वादळवाऱ्यामुळे फळबागाही गंभीर नुकसानाला सामोरे गेल्या आहेत.



यामुळे महसुल आणि कृषी विभागांनी एकत्र येऊन नुकसान झालेल्या भागांमध्ये पंचनामे करून अहवाल शासनाला पाठवावा, जेणेकरून शेतकऱ्यांना वेळेत आणि योग्य नुकसानभरपाई मिळू शकेल. आमदारांनी पुढे म्हटले की, करमाळा तालुक्यातील या नुकसानामुळे पिकांचे उत्पादन मोठ्या प्रमाणात कमी होण्याची शक्यता आहे, त्यामुळे प्रति हेक्टर दोन लाख रुपयांची भरपाई देणे गरजेचे आहे.
ही मागणी जिल्हाधिकारी, कृषी मंत्री, महसुल मंत्री आणि पालकमंत्री यांच्यासमोर देखील मांडण्यात आली आहे.आमदार नारायण पाटील यांनी प्रशासनाकडे त्वरित आणि ठोस पावले उचलण्याचीही विनंती केली आहे.

# सोलापूरमध्ये काँग्रेसला मोठा धक्का:माजी मंत्री सिद्धाराम म्हेत्रेंनी पक्षाचा हात सोडला

## ३१ मे रोजी एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेत करणार प्रवेश


● सह्याद्रीचा राखणदार

**सोलापूर (वृत्तसंस्था)**-सोलापूरमधील काँग्रेसचे नेते सिद्धाराम म्हेत्रे हे एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेत प्रवेश करणार असल्याची माहिती मिळत आहे. त्यांनी नुकतीच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेतली. ३१ मे रोजी आपण शिवसेनेत प्रवेश करणार असल्याचे सिद्धाराम म्हेत्रे यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर सिद्धाराम म्हेत्रे यांचा शिवसेनेतील प्रवेश हा काँग्रेससाठी मोठा हादरा मानला जात आहे.
सिद्धाराम म्हेत्रे हे काँग्रेसचे सोलापूर जिल्ह्यातील प्रभावशाली आणि अनुभवी नेते मानले जातात. त्यांनी अक्कलकोट विधानसभा मतदारसंघातून आमदार म्हणून प्रतिनिधित्व केले आहे, तसेच गृहराज्यमंत्री पदाची जबाबदारीही यशस्वीरित्या सांभाळली आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली अनेक वर्षे काँग्रेसने सोलापूर जिल्ह्यात आपली पकड मजबूत ठेवली होती. मात्र आता त्यांनी थेट एकनाथ शिंदेंची भेट घेतल्यामुळे जिल्ह्यातील राजकारणात एक नवे वळण येण्याची शक्यता आहे.
काँग्रेसने मला भरपूर काही दिले, पण मागच्या काही वर्षात ज्या पद्धतीने ताकद द्यायला पाहिजे होती ती दिली नाही. कार्यकर्त्यांना अनेक प्रकारे त्रास होत होता, त्यामुळे काहीतरी निर्णय घ्या, असा कार्यकर्त्यांचा आग्रह होता. एकनाथ शिंदे साहेबांच्या सोबत गेले पाहिजे असे कार्यकर्त्यांनी सांगितले त्यामुळेच हा निर्णय घेतला, असे सिद्धाराम म्हेत्रे म्हणाले. ३१ मे रोजी एकनाथ शिंदेच्या उपस्थितीमध्ये अक्कलकोटमध्ये प्रवेश होईल असेही त्यांनी सांगितले.
सुशीलकुमार शिंदे, प्रणिती शिंदे यांच्याबद्दल मला काहीही बोलायचे नाही. ज्या पद्धतीने सचिन कल्याण शेट्टी यांना त्यांच्या पक्षाने ताकद दिली, तशी ताकद काँग्रेसकडून मिळाली नाही. आमच्या कार्यकर्त्यांना अनेक प्रकारे त्रास तालुक्यात दिला जात होता. तो थांबला पाहिजे म्हणून हा प्रवेश आहे. जर दिला जाणारा त्रास थांबला नाही, तर मित्रपक्षांत देखील संघर्ष मला करावा लागणार आहे. दुश्मन से दोस्ती हर हाल में अच्छी असे म्हटले जाते.

# मुल एमआयडीसीतील इथेनॉल कंपनीत भीषण अपघात; मजुराचा मृत्यू

सह्याद्रीचा राखणदार

**मुल (प्रतिनिधी):** मुल तालुक्यातील एमआयडीसी क्षेत्रातील कार्निवल इंडस्ट्रीज प्रायव्हेट लिमिटेड या इथेनॉल उत्पादक कंपनीत शनिवारी सकाळी भीषण अपघात झाला. या अपघातात २० वर्षीय रसिक रमेश गेडाम (रा. राजगड) याचा मृत्यू झाला. रसिक कंपनीत मजूर म्हणून काम करत होता. सुमारे सकाळी ९ वाजताच्या सुमारास मिळालेल्या माहितीनुसार, बिहार येथील ठेकेदार राजेंद्र यांच्या आदेशानुसार रसिकला मशीन बंद करण्याचे काम देण्यात आले होते. काम करत असताना त्याचा शर्ट मशीनमध्ये अडकला. शर्ट काढण्याचा प्रयत्न करताना त्याचा हात मशीनमध्ये अडकून तो गंभीर जखमी झाला.



तत्काळ कंपनी प्रशासनाने रसिकला मुल येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले, मात्र डॉक्टरांनी तपासणीनंतर त्याला मृत घोषित केले. पोस्टमार्टमनंतर मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आला आणि राजगड येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात असून, कंपनीतील सुरक्षा व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहेत. नातेवाईक आणि स्थानिक नागरिकांनी संबंधित यंत्रणांनी या घटनेची तत्काळ चौकशी करण्याची मागणी केली आहे.

# केळवा बीचवरील रिसॉर्टमध्ये विवाहित महिलेचा संशयास्पद मृत्यू; पोलीस तपास सुरु

**पालघर (प्रतिनिधी):** पालघर जिल्ह्यातील केळवा बीच येथील 'दर्या निवास' रिसॉर्टमध्ये फिरायला आलेल्या २७ वर्षीय प्रियंका पवार (रा. विरार आगाशी) यांचा शुक्रवारी सकाळी ११.३० च्या सुमारास संशयास्पद मृत्यू झाला आहे. प्रियंका आपल्या जुन्या सहकारी मित्रासोबत येथे आली होती.
प्राथमिक माहितीनुसार, त्यांनी चायनीज चिकन आणि थंड पेय थम्सअप एकत्र घेतले. अचानक प्रियंकाला ठसका आला आणि



ती बेशुद्ध होऊन जमिनीवर कोसळली. तिच्या सहकार्याने तत्काळ पोलीसांना बातमी देण्यात आली.सायंकाळी साडेपाच वाजता केळवा सागरी पोलीस ठाण्याचे अधिकारी घटनास्थळी पोहोचले आणि पाहणी केली. त्यानंतर अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असून, पुढील तपास सुरु आहे.प्रियंकाला एक सात वर्षांची मुलगी आहे. मृत्यूचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही; अन्नातील विषबाधा किंवा इतर कोणतीही शक्यता लक्षात घेत तपास सुरू आहे.घटनेने परिसरात खळबळ उडाली असून, स्थानिकांमध्ये चिंता व्यक्त केली जात आहे. पोलीस अधिक तपास करत आहेत.

# शिरुर भाजप तालुकाध्यक्षपदी राहूल पाचर्णे; बाभुळसर बुद्रुकमध्ये आदर्श सरपंच दीपाली नागवडे यांच्या हस्ते गौरव



• सह्याद्रीचा राखणदार

**शिरूर (रमेश बनसोडे):** शिरुर तालुक्यात भारतीय जनता पक्षाच्या तालुकाध्यक्षपदी राहूल पाचर्णे यांच्या निवडीमुळे एक नवा राजकीय अध्याय सुरू झाला आहे. स्व. आमदार बाबूराव पाचर्णे यांचे सुपुत्र असलेले राहूल पाचर्णे यांनी वडिलांच्या कार्याचा वारसा जपत पक्षासाठी सातत्याने कार्य केले आहे. त्यांच्या नियुक्तीच्या निमित्ताने बाभुळसर बुद्रुक येथे ग्रामस्थांच्या उपस्थितीत सन्मान समारंभ आयोजित करण्यात आला. यावेळी गावकऱ्यांनी त्यांना भरभरून शुभेच्छा देत पुढील वाटचालीसाठी पाठिंबा दर्शवला.

आदर्श सरपंच दीपाली महेंद्र नागवडे यांच्या हस्ते झालेल्या सत्कार सोहळ्यात गावातील लोकप्रतिनिधी, सामाजिक कार्यकर्ते, युवक आणि नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले. प्रमुख पाहुणे म्हणून सामाजिक कार्यकर्ते अण्णा चव्हाण, शाळा व्यवस्थापन समितीचे माजी उपाध्यक्ष महेंद्र तात्या नागवडे, युवा कार्यकर्ते सोमनाथ नागवडे, मुकेश साठे तसेच पत्रकार परिषद तालुका सचिव अल्लाउद्दीन अलवी यांची उपस्थिती होती.यावेळी बोलताना राहूल पाचर्णे म्हणाले, पक्षश्रेष्ठींनी दाखवलेला विश्वास आणि शिरुर तालुक्यातील जनतेने दिलेले प्रेम मी कधीही व्यर्थ जाणार नाही, ही माझी ग्वाही आहे. स्व. बाबूराव पाचर्णे यांनी संघर्षातून भाजपला बळ दिलं. त्यांच्या आदर्शांचा प्रकाश माझ्या प्रत्येक कृतीमागे असेल.

स्व. बाबूराव पाचर्णे यांचं राजकीय आणि सामाजिक योगदान आजही लोकांच्या स्मरणात आहे. त्यांच्या स्मृतींना उजाळा देत, राहूल दादांच्या नेतृत्वाबद्दल कार्यकर्त्यांमध्ये नव्या आशा निर्माण झाल्या आहेत. या सन्मान सोहळ्याने केवळ राजकीय सन्मानच नव्हे, तर एका प्रेरणादायी वारशाची पुनःप्रचिती करून दिली.कार्यक्रमात युवा कार्यकर्त्यांनी घोषणांच्या गजरात परिसर दणाणून सोडला. सत्काराच्या क्षणांना अनेकांनी मोबाईलमध्ये टिपून ठेवले. संयोजन व सूत्रसंचालन देखील अत्यंत नेटकेपणाने पार पडले.

राहूल पाचर्णे यांची नियुक्ती ही केवळ पक्षपदापुरती मर्यादित नसून, ती शिरुर तालुक्याच्या विकासाची एक नवी दिशा ठरवणारी ठरेल, असा विश्वास कार्यकर्त्यांतून व्यक्त होत आहे.

## राज्यात १ जूनपासून महसूल विभागाचं 'महाराज स्व अभियान'

### प्रलंबित फेरफार, अकृषिक परवानग्यांना गती

• सह्याद्रीचा राखणदार

**सातारा (प्रतिनिधी):** राज्यातील शेतकरी, भूमिहीन आणि सर्वसामान्य नागरिकांच्या महसूल विभागाशी संबंधित प्रलंबित कामकाजांना गती देण्यासाठी राज्य शासनाने १ जून ते ३१ जुलै या कालावधीत 'महाराज स्व अभियान' राबविण्याचा निर्णय घेतला आहे. महसूल विभागाचे सहसचिव डॉ. सत्यनारायण बजाज यांनी याबाबतचा अध्यादेश जारी केला असून, या अभियानामुळे नागरिकांच्या विविध न्यायहक्कांच्या प्रश्नांवर तातडीने कार्यवाही होणार आहे. या अभियानाअंतर्गत फेरफार प्रकरणांचा एक महिन्यात निकाल लावणे बंधनकारक असून, मंडलनिहाय फेरफार अदालती घेण्याचे आदेश देण्यात आले आहेत. तहसीलदार, उपविभागीय अधिकारी व जिल्हाधिकारी या पातळीवर तीन महिन्यांहून अधिक कालावधीसाठी प्रलंबित असलेली प्रकरणेही मार्गी लावण्याचे आदेश आहेत.

भूसंपादन केलेल्या जमिनींना अकृषिक परवानगी (एन.ए.) देणे, जात प्रमाणपत्रे गाव दप्तरात संकलित करणे, तसेच जमीन महसूल संहिता १९६६ च्या कलम ४२(ब), ४२(क) व ४२(ड) अंतर्गत येणाऱ्या प्रकरणांचा समावेश करणे, अशी विविध कामे या मोहिमेद्वारे पार पाडली जाणार आहेत.या अभियाना अंतर्गत जमिनीच्या भोगवटादारांकडून अकृषिक रक्कम आकारण्यात येणार असून, ती रक्कम भरून घेतल्यानंतर संबंधित सनद देण्याची तरतूद करण्यात आली आहे. त्यामुळे सर्व मिळकतीधारकांना बांधकाम परवाने, मालमत्ता नोंदणी, एन.ए. आदेश आदींसाठी या अभियानाचा थेट लाभ होणार आहे.'महाराज स्व अभियान' हे राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये एकाच वेळी राबविण्यात येणार असून, महसूल प्रशासनातील विलंबित प्रक्रियांना गती देत नागरिकांना वेळेत सेवा देण्याचे उद्दिष्ट या उपक्रमामागे आहे. महसूल विभागाची विश्वासार्हता वाढवण्यास ही मोहीम उपयुक्त ठरेल, असा विश्वास प्रशासनामार्फत व्यक्त करण्यात येत आहे.

## भारत मातेच्या जयघोषाने दुमदुमली वरोरा नगरी

## शेकडोंच्या संख्येत निघाली युवा सैनिकांची तिरंगा बाईक रॅली

• सह्याद्रीचा राखणदार

**वरोरा (प्रतिनिधी):** भारतीय सेनेच्या ऑपरेशन सिंदूर या यशस्वी मोहिमेनंतर संपूर्ण देशभरात देशभक्तीची भावना उचंबळून आली आहे. या पार्श्वभूमीवर वरोरा तालुक्यात युवा सेनेच्या वतीने भव्य तिरंगा बाईक रॅलीचे आयोजन करण्यात आले. भारत मातेच्या जयघोषाने संपूर्ण वरोरा नगरी दुमदुमली, तर शेकडोंच्या संख्येने युवासैनिक व नागरिक सहभागी होत भारतीय जवानांना सलाम करण्यासाठी एकत्र आले.

ही रॅली रेल्वे स्टेशन चौक येथून सुरू होऊन शहीद योगेश डाहुले स्मारकापर्यंत निघाली. हातात तिरंगा धारण करून, वंदे मातरम्, भारत माता की जय अशा घोषणांनी वाजतगाजत निघालेली ही रॅली वरोऱ्यातील नागरिकांचे लक्ष वेधून घेत होती. रस्त्याच्या दुतर्फा उभ्या असलेल्या नागरिकांनीही टाळ्यांच्या गजरात या




रॅलीचे स्वागत केले.ही रॅली शिवसेना पक्षप्रमुख उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, युवा सेना प्रमुख खासदार डॉ. श्रीकांत शिंदे, तसेच चंद्रपूर जिल्हा संपर्कप्रमुख मंगेश काशिकर यांच्या आदेशानुसार व युवा सेना राष्ट्रीय कार्यकारिणी सदस्य हर्षल शिंदे यांच्या मार्गदर्शनात आयोजित करण्यात आली.

या रॅलीला युवासेना जिल्हा प्रमुख आलेख रट्टे, वरोरा-भद्रावती विधानसभा समन्वयक मुनेश्वर बदखल, बोर्डा ग्रामपंचायत सदस्य रवी देसाई यांची प्रमुख उपस्थिती लाभली होती. रॅलीचे आयोजन तालुका प्रमुख प्रणव पारेलवार व तालुका सचिव रितिक जाधव यांनी केले.या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी तालुका समन्वयक अक्षय रासेकर, अमित घोडमारे, नितीन जोगी, अनिकेत भोयर, प्रतीक जाधव, पप्पू वनकर, कुणाल बरतलवार, शुभम भोयर, वैभव पायघन, वेदांत गजबंदे, युगान्त रासेकर आदी कार्यकर्त्यांनी विशेष मेहनत घेतली.


युवासेनेच्या या उपक्रमातून देशभक्तीचा संदेश तरुणाईपर्यंत पोहोचवण्यात आला. ही केवळ रॅली नव्हे, तर भारतीय सेनेच्या शौर्याला वाहिलेली एक जिवंत मानवंदना होती. रॅलीच्या यशस्वी आयोजनाबद्दल वरोराच्या नागरिकांतून आयोजकांचे कौतुक होत आहे.

## महावितरणकडून ग्राहकांच्या सोयीसाठी टोल फ्री क्रमांक

### विजपुरवठा तक्रारी नोंदवण्यासाठी २४ तास सेवा उपलब्ध

• सह्याद्रीचा राखणदार

**सातारा (प्रतिनिधी) :**सातारा जिल्ह्यात मागील चार दिवसांपासून सुरू असलेल्या पावसामुळे अनेक भागांमध्ये विजपुरवठा खंडित



होण्याच्या घटना घडत आहेत. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीने (महावितरण) विज ग्राहकांना तक्रारी नोंदवण्यासाठी २४ तास कार्यरत असलेले टोल फ्री क्रमांक दिले आहेत. ग्राहकांनी १९१२, १८००२३३३४३५ किंवा १८००२१२३४३५ या पैकी कोणत्याही टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधून विजपुरवठा खंडित होणे, विज बिलातील अडचणी अशा विषयांवर तक्रारी नोंदवाव्यात, असे आवाहन महावितरणने केले आहे.

सध्या पावसाचा जोर वाढल्याने अनेक ठिकाणी विजेच्या तारांमध्ये बिघाड, खांबांची पडझड यामुळे विजपुरवठा खंडित होत आहे. त्यामुळे अशा परिस्थितीत ग्राहकांनी त्यांच्या भागातील अडचणी वेळेवर कळवल्यास चरहर्रींळींरीरप कडून तात्काळ दुरुस्तीसाठी पावले उचलता येतील आणि विजपुरवठा सुरळीत ठेवता येईल, असेही कंपनीने स्पष्ट केले आहे.महावितरणकडून अखंड व अचूक विजपुरवठा आणि योग्य बिलिंग यासाठी सातत्याने प्रयत्न सुरू आहेत. ग्राहकांनी दिलेल्या सूचनांमुळे सेवा अधिक चांगली करता येणार असल्याने वरील टोल फ्री क्रमांकाचा लाभ घ्यावा, असे आवाहन महावितरणकडून करण्यात आले आहे.

## साक्री तालुक्यात खासगी मार्केटचा सुळसुळाट

## शेतकऱ्यांची लूट थांबवा हर्षल ठाकरे यांची मागणी

• सह्याद्रीचा राखणदार

**धुळे (उमाकांत अहिरराव):** साक्री तालुक्यातील विविध गावांमध्ये खासगी कृषी उत्पन्न बाजार समित्यांचा झपाट्याने सुळसुळाट होत असून, या माध्यमातून शेतकऱ्यांची खुल्या बाजारात लूट सुरू असल्याचा गंभीर आरोप राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या किसान सेलचे जिल्हा कार्याध्यक्ष हर्षल ठाकरे यांनी केला आहे. याविरोधात त्यांनी जिल्हा प्रशासन व कृषी विभागाकडे ठोस कारवाईची मागणी केली आहे.

तालुक्याच्या कानाकोपऱ्यात सुरू होणाऱ्या खासगी मार्केटमुळे शेतमालाच्या खरेदी-विक्रीत पारदर्शकतेचा अभाव दिसून येत आहे. कुठलाही शासकीय दर लागू नसल्याने व्यापाऱ्यांना मनमानी करता येत असून, वजनात घोटाळा, दरफरक, आणि वेळेवर पैसे न मिळण्याच्या तक्रारी वाढत आहेत. हे खासगी बाजार अनेक ठिकाणी स्थानिक



राजकीय पुढाऱ्यांच्या आशीर्वादाने सुरू असल्यामुळे त्यावर कारवाई होत नसल्याचे ठाकरे यांनी सांगितले.

सध्या शेतकरी एकीकडे निसर्गाच्या लहरीपणामुळे संकटात आहे, त्यात या खासगी मार्केटच्या वाढत्या प्रभावामुळे त्याला मानवनिर्मित संकटांनाही सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक शोषण सुरू असून, त्याला योग्य मोबदला मिळत नाही, असे ठाकरे यांनी नमूद केले.या पार्श्वभूमीवर कृषी उत्पन्न बाजार समिती, कृषी विभाग, जिल्हा प्रशासन आणि न्यायालयीन यंत्रणांनी तातडीने लक्ष घालून कारवाई करणे आवश्यक आहे. मूल्य निर्धारण, दर नियंत्रण, वजन मोजणी यंत्रणा, परवाना नोंदणी व देखरेख या सर्व गोष्टी शासनाच्या कक्षेत यायला हव्यात, अशी मागणी त्यांनी केली.कृषी उत्पन्न बाजार कायदा व मूल्य शृंखला नियंत्रण नियम २०२० अंतर्गत तपास करून अवैध खासगी बाजारपेठा बंद करण्याची मागणी करताना हर्षल ठाकरे म्हणाले, शेतकरी हा केवळ अन्नदाता नाही, तर देशाचा कणा आहे. त्याच्या कष्टाचा न्याय्य मोबदला मिळवून देणे हे शासनाचे आणि समाजाचे कर्तव्य आहे.

## अवकाळी पावसामुळे मोहोळ तालुक्यात लग्नसोहळ्यांवर डोंगरदांडगा;आनंदावर सावट

• सह्याद्रीचा राखणदार

**मोहोळ (प्रतिनिधी):** गेला आठवडाभर सुरू असलेल्या अवकाळी पावसाने मोहोळ तालुक्यात लग्न सोहळ्यांमध्ये जोरदार खळबळ उडवली आहे. पावसामुळे मंगल कार्यालयांमध्ये आनंदाच्या ठिकाणी वाऱ्याचा वेग वाढला असून, अनेक ठिकाणी लग्न सोहळे विस्कळीत होण्याच्या मार्गावर आहेत.

मंगल कार्यालयांच्या दारात डीजेच्या तालावर नाचणाऱ्या तरुणाईला अचानक पावसाने थोपवले आहे. तसेच लग्नाच्या आधी आणि नंतर काढल्या जाणाऱ्या वरातींना पावसामुळे अडचणी येत आहेत. त्यामुळे वरपण्या मंडळींची पळापळ सुरू आहे.मोहोळ तालुक्यातील लग्नसराईचा मोसम जोरात असतानाही, अचानक दुपारी येणाऱ्या अवकाळी पावसामुळे बडेजावळी तसेच गार्डन लॉन्सवरील आयोजन रद्द करून छोटे हॉल घेण्यास भाग पाडले आहे. यामुळे उपस्थितीवरही परिणाम होत असून, दोन्ही पक्षांचे वधू-वऱ्हाडी मंडळी खूप त्रस्त झाले आहेत.अवकाळी पावसामुळे लग्न



सोहळ्याच्या खर्चावरही मोठा परिणाम झाला आहे. मंगल कार्यालयांचे भाडे, जेवणावळीचा खर्च, डीजे, डॉल्बी, वाजंत्री, फटाके, विद्युत रोषणाई यांसाठी मोठी रक्कम खर्च करूनही नकोसा परिणाम होत आहे. अनेकदा मोठ्या खर्चानंतर लग्न थांबवून बंदिस्त खोलीत करावे लागले आहे.मंगल कार्यालयाचे व्यवस्थापक म्हणाले की, वधू-वरांच्या पित्यांना हा आर्थिक ताण जास्त पडत असून आनंदावर विरजण पडत आहे. लाखो रुपयांचा खर्च करूनही आनंदाचा अपुरवठा होत आहे.अवकाळी पावसामुळे मोहोळ तालुक्यातील लग्न सोहळे सध्या मोठ्या संकटात सापडले आहेत.

## शिक्षक भारतीच्या प्रयत्नांना यश

## आवक शाखा पुन: सुरू करण्याचे शिक्षण विभागाचे आदेश

• सह्याद्रीचा राखणदार

**सोलापूर (प्रतिनिधी):** माध्यमिक शिक्षण विभागाची आवक शाखा १ मे २०२५ पासून बंद होती. यामुळे जिल्ह्यातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, मुख्याध्यापक, विद्यार्थी आणि संस्थाचालक यांना शाळा विषयक पत्रव्यवहार, प्रस्ताव व निवेदने सादर करण्यात अडचणींचा सामना करावा लागत होता. या समस्येबाबत शिक्षक भारती संघटनेने ठाम भूमिका घेतली. संघटनेच्या प्रयत्नांना यश मिळताच माध्यमिक शिक्षणाधिकारी सचिन जगताप यांनी दिनांक २३ मे २०२५ रोजी आवक शाखा पुन्हा सुरू करण्याचे आदेश दिले.

आवक शाखा सुरू झाल्यामुळे आता शिक्षक, कर्मचारी व इतर संबंधित व्यक्तींना थेट माध्यमिक शिक्षण विभागात आवश्यक पत्रव्यवहार करण्यास आणि त्याचा पाठपुरावा करण्यास सुलभता मिळणार आहे.


दैनिक
सह्याद्रीचा राखणदार

sahyandri rakhandar 22 May 20254 copy
22 May 2025

### माध्यमिक शिक्षण विभागाची आवक शाखा बंद, शिक्षक भारती संघटनेतून तीव्र नाराजी

सातारा । प्रतिनिधी

जिल्हा परिषद, सोलापूरच्या माध्यमिक शिक्षण विभागातील आवक शाखा दिनांक १ मे २०२५ पासून बंद असल्याने शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. आता सर्व प्रस्ताव आणि शाळा विषयक पत्रव्यवहार फक्त ई-मेलद्वारे स्वीकारला जात असून प्रत्यक्ष कार्यालयात कोणताही व्यवहार होत नाही. माध्यमिक शिक्षणाधिकारी सचिन जगताप यांच्या आदेशानुसार विभागाच्या अधिकृत ई-मेलवर पत्रे पाठवावी लागतात, ज्यामुळे पारंपरिक कामकाजात अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असल्याची तक्रार शिक्षक भारती संघटनेने व्यक्त केली आहे.शिक्षक भारती सोलापूरचे प्रतिनिधी म्हणाले की, ई-मेल पाठवल्यानंतरही प्रत्यक्ष भेटून प्रस्ताव दाखवावा, काउंटर सिग्नेचर घ्यावा आणि नंतर संबंधित अधिकाऱ्यांशी संपर्क साधावा लागतो. त्यामुळे कार्यालयीन कामकाजात पारदर्शकता नसल्याचे आणि कर्मचाऱ्यांना अनावश्यक धावपळ करावी लागत असल्याचे सांगितले जात आहे. आवक शाखा बंद झाल्यामुळे प्रस्ताव पोहोचला आहे की नाही, त्यावर कोणतीही खात्री नसल्याने कामे रखडल्याची तक्रार आहे. यामुळे कर्मचाऱ्यांमध्ये संभ्रम आणि अस्वस्थता निर्माण झाली आहे.


शिक्षक भारती संघटनेचे जिल्हाध्यक्ष सुजितकुमार काटमोरे यांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर प्रभावी आणि पारदर्शक पद्धतीने होण्यासाठी पुढील मागण्या केल्या आहेत. त्यात प्रत्येक महिन्यात ई-मेलद्वारे आलेल्या सर्व प्रस्तावांची यादी प्रकाशित करणे, त्यावरची कार्यवाही स्पष्ट करणे, तसेच कर्मचाऱ्यांना सतत अधिकाऱ्यांकडे धावपळ करावी लागू नये, यासाठी आवश्यक पावले उचलण्याची मागणी करण्यात आली आहे. संघटनेने प्रशासनाला नमूद केले आहे की, ई-प्रणालीचा उद्देश सर्वांच्या सोयीसाठी असला पाहिजे; अन्यथा या नव्या पद्धतीमुळे गैरसमज, विलंब आणि भ्रष्टाचाराला वाव मिळू शकतो.शिक्षक भारतीचे जिल्हा प्रवक्ता विजयकुमार गुंड यांनी याबाबत माहिती दिली आहे.

शिक्षक भारती सोलापूरच्या जिल्हाध्यक्ष सुजितकुमार काटमोरे यांनी बंदीमुळे निर्माण झालेल्या अडचणींवर संघटनेची भूमिका मांडल्याने प्रशासनाने पारदर्शक आणि सुलभ कार्यपद्धतीबाबत सकारात्मक पावले उचलली.

शिक्षक भारतीचे जिल्हा प्रवक्ता विजयकुमार गुंड यांनी सांगितले, शिक्षक व कर्मचाऱ्यांच्या अडचणी लक्षात घेऊन प्रशासनाने घेतलेला हा निर्णय स्वागतार्ह आहे. आता कोणतीही फाईल आवक शाखेमध्ये जमा केल्यानंतर ताबडतोब आवक क्रमांक मिळेल आणि आवश्यक तो पोहोच होईल. शिक्षक भारती संघटना सदैव शिक्षकांच्या हितासाठी सजग आणि सक्रिय राहणार आहे.या निर्णयामुळे सोलापूरमधील शिक्षण क्षेत्रातील कामकाज अधिक सुलभ आणि कार्यक्षम होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## कांदा, मका, टोमॅटो व डाळींब फळबागा पिके बुडाली

### शिंदेंच्या सेनेच्या तालुका अध्यक्षाचा तहसीलदारांना पंचनाम्याचा आग्रह



सह्याद्रीचा राखणदार

**धुळे (उमाकांत अहिरराव):** साक्री तालुक्यातील काटवान परिसरात दि. १९ व २० तारखेला मध्यरात्री ढगफुटीसारखा पाऊस झाला. बेहेड, विटाई, निळगव्हाण, काळगांव, दारखेल, नाडसे, नांदवण, धमनार, ककाणी, भडगांव यासह अनेक गावांतील शेतकरी बांधवांचे काढणीवर आलेले कांदा, मका, टोमॅटो आणि डांळींब फळपिक मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे.

यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होत असल्याने शिंदेंच्या सेनेचे किसान संघटनेचे तालुका अध्यक्ष छोटूराम तोरवणे यांनी तहसीलदार साहेबराव सोनवणे यांना निवेदन दिले आहे. त्यांनी नुकसानभरपाईसाठी तातडीने तलाठी व सर्कल अधिकारी यांना पंचनामा करण्यासाठी आदेश देण्याची मागणी केली आहे. शेतकऱ्यांना न्याय मिळावा आणि नुकसानभरपाईची प्रक्रिया त्वरीत पार पडावी, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## मराठी साहित्य संमेलन उद्यानाचे भूमिपूज

• सह्याद्रीचा राखणदार

**पुणे (वृत्तसंस्था):** मराठी भाषेचे जतन, संवर्धन करुन पुढच्या पिढीला देखील मराठी भाषेचे ज्ञान उपलब्ध झाले पाहिजे, याकरिता प्रत्येक मराठी भाषिकाला अभिमान वाटेल अशाप्रकारे जागतिक पातळीवर मराठी भाषेचा प्रचार आणि प्रसार करण्याकरिता राज्यशासन प्रयत्नशील आहे, असे प्रतिपादन राज्याचे मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांनी केले. मराठी भाषेचा प्रचार आणि प्रसार करणाऱ्या व्यक्ती, संस्थेला राज्य शासनाच्या वतीने सर्वतोपरी सहकार्य करण्यात येईल, असेही ते म्हणाले.गुजर-निंबाळकरवाडी येथे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन उद्यान भूमिपूजन प्रसंगी ते बोलत होते. यावेळी सरहद संस्थेचे संजय नहार, अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे अध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी यांच्यासह संजय पगारिया, अनुज नहार, यशपाल जवळगे तसेच साहित्यप्रेमी उपस्थित होते.सामंत म्हणाले, दिल्ली येथील अखिल भारतीय साहित्य संमेलनात अनेक सकारात्मक गोष्टी घडल्या. सांस्कृतिक, साहित्याची ऊर्जा मिळाली. सरहद संस्थेमार्फत समाजोपयोगी संकल्पना आखून त्या यशस्वीरित्या पार पाडण्याचे काम करण्यात येत आहे. त्यातून समाजाला नवीन दिशा मिळाली आहे.सरहद संस्थेचे संजय नहार यांच्या संकल्पनेतून हे उद्यान साकारत आहेत. साहित्याच्या क्षेत्रात काम करणारे दर्दी लोक आज अतिशय उत्तम पद्धतीने देशातील पहिले साहित्याचे दालन खुले करीत आहेत. मराठी भाषेचे जतन, प्रचार, प्रसार आणि संवर्धन झाले पाहिजे. अशा अनेक गोष्टी अशा कार्यक्रमातून साकार होतात म्हणून असे कार्यक्रम झाले पाहिजेत, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

# देवळी-दहेगाव रस्त्यावर चिखलाचे साम्राज्य

## नागरिकांना जीव मुठीत घेऊन करावा लागतो प्रवास

• सह्याद्रीचा राखणदार

**देवळी (प्रतिनिधी):** पुलगाव-दहेगाव ते देवळी-वायगाव रस्त्याचे काम गेल्या काही महिन्यांपासून सुरू असून, सध्या या रस्त्यावर प्रवास करणे जीवावर येत आहे. रस्त्याच्या एका बाजूने खोदकाम करण्यात आले आहे आणि उर्वरित रस्त्यावर खोदलेल्या बाजूची माती पडल्याने संपूर्ण मार्गावर चिखलाचे साम्राज्य पसरले आहे.या रस्त्यावरून चिकणी, जामणी, दहेगाव, पडेगाव, निमगाव या गावांकडे जाणाऱ्या दुचाकी आणि चारचाकी वाहनांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. आज सकाळपासून सुरू असलेल्या रिमझिम पावसामुळे माती ओलसर होऊन चिखलात बदलली, परिणामी देवळी-दहेगाव रस्ता काही काळासाठी पूर्णतः बंद झाला.रस्त्याच्या स्थितीमुळे अनेक चारचाकी गाड्या चिखलात अडकल्या, तर दुचाकीस्वार घसरून पडले, आणि काहींच्या गाड्यांची चाके मातीने अडकून बसली. काही वाहनचालकांना मालवाहू गाड्यांच्या मदतीने देवळीपर्यंत पोहोचावे लागले, तर काहींनी रस्त्याच्या कडेला गाड्या थांबवून ठेवण्याचा निर्णय घेतला.

रस्ता बंद झाल्याने नागरिकांना पर्यायी मार्ग म्हणून सालोड किंवा निमगाव-पडेगाव-देवळी मार्गाचा वापर करावा लागत आहे, ज्यामुळे प्रवासात ८ ते १० किमीची वाढ होते.ठेकेदाराने एका बाजूने रस्ता खोदून दुसऱ्या बाजूने वाहतुकीसाठी कोणतीही तात्पुरती व्यवस्था केली नसल्यामुळे वाहनचालक आणि शेतकरी वर्गाला मोठा त्रास सहन करावा लागत आहे. शेतीचा हंगाम सुरू झाल्यामुळे, शेतात लागणाऱ्या साहित्याची वाहतूक करणे अडचणीचे ठरत आहे.या रस्त्यावर आतापर्यंत अनेक अपघात झाले असून, प्रशासन किंवा कंत्राटदार याकडे दुर्लक्ष करत असल्याची नागरिकांतून तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. ठेकेदाराने किमान तात्पुरत्या उपाययोजना करून रस्ता वाहतुकीस योग्य ठेवावा, अशी मागणी जोर धरत आहे.




# जय विकास महाविद्यालय शिरपूर यास नॅक कडून 'बी' दर्जा

• सह्याद्रीचा राखणदार

**शिरपूर होरे (प्रतिनिधी):** ग्रामीण भागात दर्जेदार शिक्षण देणाऱ्या जय विकास महाविद्यालय, शिरपूर होरे यास राष्ट्रीय मूल्यांकन व मान्यता परिषद (नॅक) कडून 'बी ' दर्जा प्राप्त झाला आहे. दिनांक १३ व १४ रोजी बेंगळुरू येथील नॅक समितीने वर्च्युअल मोड च्या माध्यमातून महाविद्यालयाच्या शैक्षणिक, प्रशासकीय व भौतिक सुविधा, नवीन उपक्रम, विद्यार्थी प्रगती, पालक व विद्यार्थ्यांसोबतचा संवाद आदी बाबींचा सविस्तर आढावा घेतला.

नॅक समितीचे प्रमुख डॉ. अपूर्व घोष, सदस्य डॉ. प्रदीप डिओटा आणि डॉ. मैथिली श्रीनिवासन यांनी व्हिडीओ टच्युअर व सादरीकरणाच्या माध्यमातून महाविद्यालयाची पाहणी केली. संस्थेचे अध्यक्ष जितेंद्र महल्ले





व सचिव अथर्व महल्ले यांनी समितीचे स्वागत केले.या दोन दिवसीय मूल्यांकन प्रक्रियेत प्रभारी प्राचार्य डॉ. मनोज ढोणे, नॅक समन्वयक प्रा. निलेश गोंडे यांनी पॉवर पॉईंट सादरीकरणाद्वारे महाविद्यालयाची माहिती दिली. प्रा. डॉ. दिलीप गुर्जर, डॉ. अमित दारुंडे, प्रा. विजय फुलकर, प्रा. मंगेश भगत, प्रा. महेंद्रकुमार बेताल, प्रा. निता देशभ्रतार, प्रा. सविता लोखंडे, प्रा. वैशाली धोंगडे, प्रा. वैशाली महल्ले, वरिष्ठ लिपिक शांताराम कडू, ग्रंथपाल खुळे, तांत्रिक सल्लागार आशिष बर्धिया, सर्व विभागप्रमुख, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे मोलाचे सहकार्य लाभले.पहिल्याच प्रयत्नात नॅक कडून 'बी ' दर्जा मिळाल्याने महाविद्यालयाचे सर्वच स्तरांवरून अभिनंदन होत आहे.

# धामणगाव रेल्वे तालुक्यात बुधवारी अवकाळी पावसामुळे लाखोंचे नुकसान

• सह्याद्रीचा राखणदार

**धामणगाव रेल्वे (प्रशांत मुन):** धामणगाव रेल्वे तालुक्यात बुधवारी भर उन्हाळ्यात अवकाळी पावसाने हजेरी लावली. या अनपेक्षित पावसामुळे तिळ, भुईमूग, कांदा तसेच इतर पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे. विशेष म्हणजे, या नुकसानीची अद्यापही शासनस्तरावर दखल घेण्यात आलेली नाही.

शेतकरी आधीच आर्थिक अडचणीत असून, उत्पादन होईल की नाही याची खात्री नसतानाही ते आपल्या शेतीवर लाखो रुपये खर्च करतात. यासोबतच बाजारातही त्यांच्या पिकांना योग्य भाव मिळत नाही. या पार्श्वभूमीवर अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीने शेतकऱ्यांची चिंता आणखी




वाढली आहे.

या परिस्थितीवर तातडीने उपाययोजना करत शासनाने शेतकऱ्यांना आर्थिक मदत जाहीर करावी, अशी मागणी शेतकरी बांधवांकडून करण्यात येत आहे.दरम्यान, आमदार प्रतापदादा अडसड यांनी संबंधित अधिकाऱ्यांना यासंदर्भात सूचनाही दिल्या असून, नुकसानीचा तातडीने पंचनामा करून अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत. सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी ठामपणे उभी आहे आणि त्यांना योग्य ती मदत मिळवून दिली जाईल, असे आश्वासन आमदार अडसड यांनी दैनिक सह्याद्रीचा राखणदार या वृत्तपत्राशी बोलताना दिले.

# धामणगाव रेल्वे तालुक्यात पोलिस व कृषी विभागाची संयुक्त कारवाई

## दीड लाखांचे प्रतिबंधित कापूस बियाणे जप्त

• सह्याद्रीचा राखणदार

**धामणगाव रेल्वे (प्रतिनिधी):** धामणगाव रेल्वे तालुक्यातील रामगाव रस्त्यावरील एका शेतात प्रतिबंधित व संशयास्पद कापूस बियाण्यांचा मोठा साठा जप्त करण्यात आला. गोपनीय माहितीनंतर पोलिस आणि तालुका कृषी कार्यालयाने संयुक्तपणे कारवाई करत १७५ पाकिटे, म्हणजेच एकूण सात गोण्या कापूस बियाणे हस्तगत केली. या मुद्देमालाची अंदाजित किंमत सुमारे १,५७,६७५ रुपये इतकी आहे.

ही कारवाई दत्तापुर पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक गिरीश ताथोड आणि तालुका कृषी अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. जप्त केलेले बियाणे नमुने तपासणीसाठी नागपूर प्रयोगशाळेत पाठवण्यात आले असल्याची माहिती कृषी विभागाकडून देण्यात आली आहे.

मागील तीन-चार वर्षांत कृषी केंद्राशी संबंधित



काही लोकांवर बोगस बियाण्यांची विक्री केल्याबद्दल कारवाई झाली असून, हे जाळे अद्यापही सक्रिय असल्याची चर्चा शेतकरी वर्गात आहे. वेगवेगळ्या नावाने आणि ब्रँडखाली बोगस बियाणे विक्री सुरू असून, काहीजण प्रशासनाच्या मर्जीने हे प्रकार चालवित असल्याचा आरोपही शेतकरी करत आहेत.अशा बोगस बियाण्यांमुळे शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होत असून, यावर तातडीने कठोर पावले उचलण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

### श्री शनि जन्मोत्सव महापर्व २०२५ चे भव्य आयोजन

# २६-२७ मे रोजी श्री जागृत शनि मंदिर सालोड (हि.) येथे दिव्य धार्मिक अनुष्ठान

• सह्याद्रीचा राखणदार

**वर्धा (प्रतिनिधी):** ज्येष्ठ मासातील सोमवती अमावस्येच्या पावन निमित्ताने श्री शनि जन्मोत्सव महापर्व २०२५ चे आयोजन २६ व २७ मे रोजी श्री जागृत शनि मंदिर, सालोड (हि.) व श्री शनि मंदिर देवस्थान, पुलगाव बायपास रोड, वर्धा येथे अत्यंत श्रद्धा, भक्ती आणि उत्साहात होणार आहे.

या विशेष प्रसंगी मंदिर आकर्षक रोषणाई व सजावटीने सजवण्यात येणार असून, भाविकांसाठी भगवान श्री शनिदेवांचे अलौकिक श्रृंगार, छप्पन भोग दर्शन, महाअभिषेक, शनि शांती यज्ञ, नवग्रह पूजन, दीपदान महोत्सव, भजन संध्या आणि महाप्रसाद यांसारख्या दिव्य कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.शनिदेव सेवा, न्याय आणि कर्माचे देवता मानले जातात. श्रद्धा आणि समर्पणाने त्यांची पूजा केल्यास आयुष्यातील कष्ट, रोग, ऋण व अडचणी दूर होतात, असे मानले जाते. शनिदेव हे केवळ दंडाचे नव्हे,



तर न्याय, सुधारणा आणि सेवाभावाचे प्रतीक आहेत. मंदिराचे मुख्य पुजारी पं. सतीश शर्मा आणि ज्योतिषाचार्य तरुण शर्मा यांनी सर्व श्रद्धाळूंना आवाहन केले आहे की, त्यांनी या पुण्यदायी पर्वाचा लाभ घ्यावा आणि भगवान शनिदेवांच्या कृपेचा अनुभव घ्यावा.

**कार्यक्रमाचे संक्षिप्त वेळापत्रक**

सोमवार, २६ मे २०२५
सकाळी ४ वाजता: पंचामृत व तैलाभिषेक स्नान
सकाळी ६ वाजता: श्री गणेश पूजन
सकाळी ८ वाजता: शिव व नवग्रह पूजन
सकाळी ९ वाजता: शनि शांती यज्ञ
सायं. ६ वाजता: भजन संध्या
रात्री १२ वाजता: श्री शनि जन्म आरती
मंगळवार, २७ मे २०२५
सकाळी ९ वाजता: नवग्रह व शनि शांती यात्रा
सायं. ६ वाजता: भजन संध्या
रात्री ९ वाजता: दीपदान महोत्सव

# डिकसळ-कोंढार चिंचोली नव्या पुलाच्या कामाची माजी आमदार संजयमामा शिंदेंनी केली पाहणी

• सह्याद्रीचा राखणदार

**सोलापूर (प्रतिनिधी):** करमाळा तालुक्यातील पश्चिम भागातील डिकसळ येथील ब्रिटिश काळीन पुल खचल्यामुळे या भागातील जडवाहतूक थांबवली होती. त्यानंतर किरकोळ दुरुस्ती करून हलक्या वाहनांची वाहतूक सुरू होती. मात्र, पुणे, नगर, सोलापूर या तीन जिल्ह्यांना जोडणाऱ्या डिकसळ पुलाचा कायमस्वरूपी प्रश्न सोडवण्यासाठी माजी आमदार संजयमामा शिंदेंनी महाविकास आघाडी सरकारच्या काळात अर्थमंत्री अजितदादा पवार यांच्या सहकार्यातून ५५ कोटी रुपयांची मंजुरी मिळवली होती.



नंतर अनेक सरकारांनी या कामावर स्थगिती आणली होती. ती स्थगिती उठल्यानंतर जुलै २०२३ मध्ये प्रशासकीय मान्यता मिळाली आणि २०२४ मध्ये काम सुरू झाले. मात्र, विविध कारणांमुळे ३६ महिन्यांच्या मुदतीपैकी २० महिने गेले तरी काम पूर्ण झालेले नाही. माजी आमदार संजयमामा शिंदे यांनी या पुलाच्या कामाबाबत सध्या सरकारमध्ये नसतानाही अडचणी सोडवण्यासाठी कटिबद्ध असल्याचे सांगितले. त्यांनी अर्थमंत्री अजितदादा पवार यांच्या सहकार्यातून कामात कुठलाही अडथळा येणार नाही, असे आश्वासन दिले.यावेळी बारामती ग्रो कारखान्याचे उपाध्यक्ष सुभाष आबा गुळवे, संबंधित ठेकेदाराचे मॅनेजर आणि कर्मचारीही उपस्थित होते.

# निराधार लाभार्थ्यांसाठी हयात प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक

## तहसीलदार ओंकार ठाकरे यांचे आवाहन

• सह्याद्रीचा राखणदार

**मुल (प्रतिनिधी):** संजय गांधी निराधार अनुदान योजना ही महाराष्ट्र शासनाची एक महत्त्वाची योजना असून, निराधार, अपंग, अनाथ मुले तसेच दुर्धर आजारांनी ग्रस्त व्यक्तींना दरमहा आर्थिक सहाय्य पुरवण्यात येते. या योजनेचा उद्देश गरजूंना आर्थिक आधार देऊन त्यांचे जीवन सुसह्य करणे हा आहे. या योजनेसाठी अर्जदाराचे वय १८ ते ६५ वर्षांदरम्यान असावे तसेच कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न २१,००० रुपयांपेक्षा अधिक नसावे, अशी अट आहे.योजनेचा लाभ सुरू ठेवण्यासाठी हयात (जीवंत असल्याचे) प्रमाणपत्र दरवर्षी सादर करणे आवश्यक आहे. या पार्श्वभूमीवर, तालुक्यातील सर्व लाभार्थ्यांनी आपले हयात प्रमाणपत्र संबंधित तलाठी कार्यालयात किंवा तहसील कार्यालय, मुल येथील निराधार विभागात लवकरात लवकर सादर करावे, असे आवाहन तहसीलदार (निराधार योजना) ओंकार ठाकरे यांनी केले आहे.

# तिसगाव-पैठण रोडवर धुळीचे साम्राज्य,आता चिखलाचा त्रास!

• सह्याद्रीचा राखणदार

**अहिल्यानगर (वजीर शेख):** पाथर्डी तालुक्यातील तिसगाव ते पैठण रोडचे काम गेल्या आठ महिन्यांपासून सुरु असून आतापर्यंत फक्त एक किलोमीटरचा रस्ता पूर्ण झाला आहे. उर्वरित रस्ता उखडलेला असून सर्वत्र मातीतून बनलेला आहे. त्यामुळे या रोडवरून चालणाऱ्या मोठ्या वाहतुकीमुळे आधी धुळीचा मोठा थैमान चालत होता, तर आता पावसामुळे रस्ता चिखलमय होऊन गाड्या चालवणं खूप अवघड झालं आहे. गेली काही महिन्ये अनेक मोटरसायकलस्वार रस्त्यावरून घसरून गंभीर दुखापत झाल्याच्या घटना घडल्या आहेत. काहींना



फ्रॅक्चर तर काहींना मार लागल्याच्या घटनाही आहेत. त्यामुळे ग्रामस्थांचे म्हणणे आहे की, या रस्त्याचे काम लवकर पूर्ण करावे किंवा तात्पुरता काही पर्याय लवकर योजावा.

नाहीतर या मार्गावर मोठ्या प्रमाणात अपघात होण्याची शक्यता आहे, आणि जर काही गंभीर दुर्घटना घडली तर त्यासाठी कोण जबाबदार ठरणार, हेही प्रश्न उपस्थित होत आहेत. ग्रामस्थांचा आग्रह आहे की, या कामावर काम करणाऱ्या कॉन्ट्रॅक्टरनेही ही बाब गांभीर्याने घेतली पाहिजे आणि त्वरित उपाययोजना करावी.

# ३६ वर्षांनी साकळे विद्यालयाच्या दहावीच्या बॅचचा स्नेहमिलन उत्साहात

• सह्याद्रीचा राखणदार

**उमरखेड (प्रतिनिधी):** साकळे विद्यालय, उमरखेड येथील १९८९ च्या दहावीच्या बॅचचे वर्गमित्र ३६ वर्षांनी एकत्र जमले. या स्नेहमिलनात जुन्या आठवणींना उजाळा मिळाला. विद्यार्थ्यांनी शाळेच्या परिसरात धमाल मस्ती केली, पारंपरिक खेळ खेळले, गाणी गायली आणि मनोगते व्यक्त केली.

कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी शाळेबद्दल आणि गुरुजनांबद्दल कृतज्ञता व्यक्त करत सिलिंग फॅन्स भेट स्वरूपात दिले व वर्गात बसवले. जवळपास ४५ मित्र आणि १५ मैत्रिणी या स्नेहमिलनाला उपस्थित होते. सर्वांनी शाळेने व्यक्तिमत्त्व घडवण्यातील महत्त्वाची भूमिका



अधोरेखित केली.

शाळेतील शिक्षक अंबादास साकळे, अनंत पांडे, भारत कुलकर्णी, प्रसाद पेन्टेवाड, आणि चौधरी सर यांची विशेष उपस्थिती लाभली. शाळेचे मुख्याध्यापक गणेश पानबुडे सर आणि शिक्षकांनी कार्यक्रमाचे उत्तम नियोजन केले. शहरातील बालरोगतज्ज्ञ डॉ. संदेश देशमुख, जयेश पानसुरिया, श्याम शुक्ला, गजानन लांडगे, प्रशांत उल्लंगवार, विरभद्रे पत्रे, ऍड मृणाल शेष (नागपुर), मीना जवादे (मूर्तीजापूर), लक्ष्मण नांदे, किसन धुळे व इतर मित्रांनी सहभाग घेतला.

## शहीद जवान संदीप गायकर यांना शासकीय इतमामात अखेरचा निरोप

# पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, आ.डॉ.किरण लहामटे यांच्यासह हजारोंनी वाहिली श्रद्धांजली

• सह्याद्रीचा राखणदार

**अकोले (प्रतिनिधी):** जम्मू-काश्मीरमधील तिसवाड सेक्टर येथे दहशतवाद्यांविरुद्ध सुरू असलेल्या सर्च ऑपरेशनदरम्यान शहीद झालेले अकोले तालुक्यातील ब्राह्मणवाडा गावचे सुपुत्र संदीप पांडुरंग गायकर (वय ३२) यांच्यावर त्यांच्या जन्मगावी शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. हजारो नागरिकांच्या उपस्थितीत साश्रुनयनांनी त्यांना अंतिम निरोप देण्यात आला.

संदीप गायकर हे लष्कराच्या १५ मराठा लाईट इन्फंट्रीतील १७ राष्ट्रीय रायफल्समध्ये कार्यरत होते. गुरुवारी (दि. २२ मे) तिसवाड सेक्टरमध्ये दहशतवाद्यांशी झालेल्या चकमकीत त्यांनी वीरमरण पत्करले. त्यांचे पार्थिव आज (२४ मे) सकाळी ब्राह्मणवाडा येथे पोहोचवण्यात आले. लष्करी सन्मानासह अंत्यसंस्कार पार पडले. भारतीय लष्कराच्या जवानांनी हवेत बंदुकीच्या फैरी झाडून शहिदाला मानवंदना दिली, तर 'भारत माता की जय' आणि 'शहीद संदीप गायकर अमर रहें' अशा घोषणा परिसरात घुमत राहिल्या.पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी त्यांच्या पार्थिवावर पुष्पचक्र अर्पण करून श्रद्धांजली वाहिली. यावेळी आमदार डॉ. किरण



लहामटे, आमदार अमोल खताळ, माजी खासदार सदाशिवराव लोखंडे, माजी आमदार वैभव पिचड, पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, पोलीस उपअधीक्षक डॉ. कुणाल सोनवणे, तहसीलदार सिद्धार्थ मोरे, पोलीस निरीक्षक मोहन बोरसे, जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी स्कॉड्रन लीडर विद्यासागर कोरडे तसेच लष्कराच्या वतीने कर्नल केतन प्रसाद व अन्य मान्यवर उपस्थित होते.

संदीप गायकर यांचा मुलगा रिहांस याने पार्थिवाला मुखाग्नि दिला. त्यांच्या पश्चात वडील, आई, पत्नी व एक मुलगा असा परिवार आहे.पालकमंत्री विखे पाटील म्हणाले, शहीद संदीप गायकर यांचे बलिदान हे सर्वांसाठी प्रेरणादायी आहे. त्यांच्या कुटुंबाच्या पाठीशी शासन ठामपणे उभे आहे. ब्राह्मणवाडा येथे त्यांच्या स्मृतीप्रित्यर्थ स्मारक उभारण्यात येईल. संदीप गायकर हे वयाच्या २० व्या वर्षी लष्करात भरती झाले होते. त्यांनी गांधीनगर, जम्मू-काश्मीरमधील पुंछ सेक्टर, ५६ राष्ट्रीय रायफल्स, मध्य प्रदेशातील घाना सागर व संयुक्त राष्ट्र संघाच्या मोहिमेतही सेवा बजावली होती. देशासाठी दिलेल्या त्यांच्या शौर्यपूर्ण बलिदानाची आठवण प्रत्येकाच्या मनात सदैव कोरली जाईल.

## चाकण औद्योगिक वसाहतीत कामगार रुग्णालयासाठी जागा मंजूर

# उद्योगांना ६ हजार १०० कोटींच्या सवलती जाहीर; उद्योगमंत्री उदय सामंत यांची माहिती

• सह्याद्रीचा राखणदार

**पुणे (वृत्तसंस्था):**महाराष्ट्र हे उद्योगांना प्रोत्साहन देणारे राज्य असून सुमारे १५ लाख ७० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक राज्य शासनाने आणली आहे. मोठ्या उद्योगांसोबतच सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांना प्रोत्साहन म्हणून मोठ्या प्रमाणात सवलती देण्याचे राज्य शासनाचे धोरण आहे, असे प्रतिपादन उद्योग मंत्री उदय सामंत यांनी केले. चाकण औद्योगिक वसाहतीतील उद्योगांच्या समस्या सोडविण्यासाठी राज्यशासन आवश्यक ते सर्व प्रयत्न करेल अशी ग्वाही त्यांनी दिली.चाकण येथील उद्योगांच्या समस्यांबाबत चाकण येथे सर्व संबंधित शासकीय विभाग आणि उद्योग संघटनांसोबत आयोजित बैठकीत ते बोलत होते. यावेळी आमदार बाबाजी काळे, महाराष्ट्र



औद्योगिक विकास महामंडळाचे मुख्य अभियंता नितीन वानखडे, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे पोलीस उपायुक्त बापू बांगर, भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे प्रकल्प संचालक संजय कदम आदींसह उद्योग संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

सामंत म्हणाले, चीन देशातून उद्योग बाहेर पडत असताना ते भारताकडे येत असून त्याचा सर्वाधिक फायदा महाराष्ट्राला झाला आहे. मोठ्या उद्योगांबरोबरच सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांना प्रोत्साहन म्हणून मोठ्या प्रमाणा सवलती देण्यात येत असून त्याची माहिती उद्योगांनी घेऊन प्रगती करावी. गेल्या तीन वर्षात दिलेल्या सवलतींपेक्षा पुढील एकाच वर्षात ६ हजार १०० कोटी रुपयांची सवलत (इन्सेंटिव्ह) देण्याचा निर्णय घेतल्याचेही त्यांनी सांगितले.यावेळी उद्योग मंत्री सामंत यांनी उपस्थित उद्योग प्रतिनिधींच्या वीज, पाणी, वाहतूक कोंडी, रस्त्यांची स्थिती आदींबाबतच्या समस्या जाणून घेतल्या.

# वैष्णवी हगवणे आत्महत्या प्रकरण:आरोपींवर कडक कारवाईची मागणी-डॉ.नीलम गोऱ्हे

• सह्याद्रीचा राखणदार

**पुणे (वृत्तसंस्था):** पुण्यातील वैष्णवी हगवणे आत्महत्या प्रकरणी विधानपरिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी गुरवारी तातडीची पत्रकार परिषद घेऊन या घटनेतील गंभीर बाबींवर चिंता व्यक्त केली. वैष्णवीने वैवाहिक आणि कौटुंबिक अत्याचाराला कंटाळून आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना समोर आली असून, ही घटना अत्यंत वेदनादायक आणि अमानुष असल्याचे डॉ. गोऱ्हे यांनी स्पष्ट केले.डॉ. गोऱ्हे म्हणाल्या,या प्रकरणातील काही आरोपींना अटक करण्यात आली असून, उर्वरित आरोपींविरोधात भारतीय न्याय संहिता २०२३ मधील कलम १०८ (आत्महत्येस प्रवृत्त करणे) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांच्या प्राथमिक चौकशीत आवश्यक पुरावे उपलब्ध झाले आहेत. वैष्णवीचा मृत्यू हा सामाजिक व कौटुंबिक दबावाचा परिणाम असून, ती



एका अन्यायकारक व्यवस्थेची बळी ठरली. तिच्या पतीसह कुटुंबीयांनी केलेल्या मानसिक आणि सामाजिक छळामुळे तिला आत्महत्येस प्रवृत्त व्हावे लागले. तिच्या मृत्यूनंतर तिचे लहान बाळ तिसऱ्या व्यक्तीच्या ताब्यात असल्याची माहितीही त्यांनी दिली. इतक्या कालावधीतील अत्याचारानंतरही तिचा आवाज समाजापर्यंत पोहोचू न शकणे, ही अत्यंत वेदनादायक बाब आहे.पीडित कुटुंबाला न्याय मिळवून देणे आणि वैष्णवीच्या मुलाच्या भविष्यासाठी शासनाने जबाबदारी स्वीकारणे आवश्यक आहे. यासोबतच अशा घटना टाळण्यासाठी शालेय आणि महाविद्यालयीन पातळीवर समुपदेशन व मार्गदर्शन कार्यक्रम राबविणे गरजेचे आहे. पोलिस विभाग आणि महिला व बालकल्याण विभागामार्फत हुंडाबळी, कौटुंबिक अत्याचार, महिलांचे हक्क याबाबत जनजागृतीसाठी विशेष मोहीम राबवावी.या प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर डॉ. गोऱ्हे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांना निवेदन देत, प्रकरणाची तातडीने दखल घेण्याची मागणी केली आहे. सर्व आरोपींना त्वरित अटक करून कठोर कारवाई व्हावी, आणि तपास प्रक्रिया पारदर्शक व निष्पक्ष राहावी यासाठी कार्यक्षम सरकारी वकील व अधिकारी नेमावेत, अशी त्यांनी विनंती केली आहे.आरोपींना कठोरात कठोर शिक्षा व्हावी यासाठी न्यायालयीन पातळीवरही प्रयत्न केले जातील.

## ५९ सदस्यांचे शिष्टमंडळ ३३ देशांना देणार भेट

# आम्ही शांतता आणि सद्भावनेचा संदेश घेऊन जात आहोत, हेच आपले संस्कार-सुप्रिया सुळे

• सह्याद्रीचा राखणदार

**मुंबई (वृत्तसंस्था):**ऑपरेशन सिंदूर आणि पाकिस्तान पुरस्कृत दहशतवादाबद्दल भारताची भूमिका मांडण्यासाठी केंद्र सरकारने ५९ सदस्यीय शिष्टमंडळाची स्थापन केले आहे. हे शिष्टमंडळ जगातील प्रमुख देशांना, विशेषतः संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेच्या सदस्य देशांना भेट देणार असून तिथे जाऊन पाकिस्तानची पोलखोल करणार आहेत. या शिष्टमंडळाची ७ गटांमध्ये विभागणी करण्यात आली आहे. गट ७ चे नेतृत्व राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या खासदार सुप्रिया सुळे करत आहेत. सुप्रिया सुळेंचा गट इजिप्त, कतार, इथिओपिया आणि दक्षिण आफ्रिका या देशांना भेटी देणार आहे.याबाबत बोलताना सुप्रिया सुळे म्हणाल्या, आम्हाला एमईए जी ब्रिफिंग देईल, त्यानुसार इतर देशांशी चर्चा केली जाईल. आमच्यावर मोठी जबाबदारी सोपवण्यात आली आहे. आम्ही जे बोलणार आहोत, ते एक जबाबदार भारतीयाप्रमाणे सर्वसोबत मिळून चर्चा करणार आहोत. यासंदर्भात आम्हा ४ गटांना उद्या ब्रिफिंग दिली जाणार आहे. परवा आम्ही जाणार आहोत. परत आल्यानंतर त्यावर सविस्तर बोलता येईल.

भारत नेहमीच शांतता आणि अमन पाहिजे असणारा देश राहिला आहे. हे आमचे संस्कार आहेत. भारत नेहमीच दहशतवादाविरुद्ध लढला आहे आणि पुढेही लढत राहील. परदेशात जाणारे आमचे सर्व खासदार शांतता आणि सुव्यवस्थाचा संदेश घेऊन जात आहेत. आपण कालही दहशतवादाच्या विरोधात होतो, आजही आहोत आणि उद्याही राहू. असेही सुप्रिया सुळे म्हणाल्या.

सुप्रिया सुळे यांनी यावेळी पुण्यातील वैष्णवी हगवणे आत्महत्या प्रकरणावरही भाष्य केले. समाज म्हणून आपल्याला काळिमा फासणारी घटना असल्याचे त्या म्हणाल्या. एकाच घरातील दोनही सुना जर पोलीस ठाण्यात जाऊन तक्रार करत असतील, तर एवढे



शिक्षण घेऊन हगवणे कुटुंबाने काय केले? असा प्रश्न निर्माण होतो, असे त्यांनी म्हटले. पाश्चिमात्य कपडे घालूनही बुरसटलेले विचार गेलेले नसतील, तर शिक्षणाचा तरी काय उपयोग. हगवणेंच्या घरात काही क्रांती घडलीच नाही, असे वाटते. हगवणे कुटुंबाने पुरोगामी विचारांचा अपमान केला आहे, अशी टीका सुप्रिया सुळे यांनी केली.

हगवणे कुटुंब हे माझ्याच लोकसभा मतदारसंघात मोडते. एक महिन्यापूर्वी त्यांच्या घरातील एका कार्यक्रमाचे आमंत्रण त्यांनी मला दिले होते. मात्र घरातील सुनांनी कौटुंबिक हिंसाचाराची तक्रार दाखल केली असल्याची माहिती मला होती, त्यामुळे मी त्या कार्यक्रमाला जाणे टाळले, असे सुप्रिया सुळे यांनी सांगितले. तसेच या कार्यक्रमाला उपमुख्यमंत्री अजित पवारही गेले नव्हते. ते काही वर्षांपूर्वी झालेल्या लग्नाला नक्कीच गेले होते. पण तेव्हा हगवणे कुटुंबाबाबतची माहिती त्यांना नसावी, असेही त्या म्हणाल्या.बीडमधील संतोष देशमुख यांच्या हत्याप्रकरणी माध्यमांनी शौर्य दाखवत ती बातमी लावून धरली होती. म्हणूनच संतोष देशमुख यांच्या हत्येचा तपास सुरळीत होऊ शकला. त्याप्रमाणेच याही प्रकरणात माध्यमांनी वैष्णवीला न्याय मिळवून देण्यासाठी हे प्रकरण लावून धरावे, असे आवाहन सुप्रिया सुळे यांनी केले. महाराष्ट्र सरकारनेही कडक कारवाई करून कोणत्याही कुटुंबाची सुनेला त्रास देण्याची हिंमत व्हायला नको, असेही त्या म्हणाल्या.वैष्णवीच्या मृत्यूनंतर गेले सहा दिवस तिच्या बाळाचे हाल झाले, अशी माहिती आता समोर येत आहे. स्वतः मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यात लक्ष घातल्यानंतर आज ते बाळ वैष्णवीच्या कुटुबांकडे सुपूर्द करण्यात आले. बाळाचा विषय अतिशय संवेदनशीलपणे हाताळावा लागेल, असे सुप्रिया सुळे म्हणाल्या. हगवणे कुटुंबिय तुरुंगात आहेत, काही सदस्य फरार आहेत. अशा वातावरणात मुल ठेवायची कुणाचीच हिंमत होणार नाही. त्यामुळे त्या बाळाची देखभाल आजी-आजोबांनी घेतलेली चांगली. कायदा आपले काम करेल. पण आम्ही माणुसकीच्या नात्याने आम्ही यात लक्ष घालू, असेही त्या म्हणाल्या.

# ४ महिन्यांत १ हजार शेतकऱ्यांच्या आत्महत्या विरोधी पक्षनेते अंबादास दानवेंनी दिली माहिती

## बाधित क्षेत्राचे पंचनामे करून भरपाई देण्याची मागणी

• सह्याद्रीचा राखणदार

**मुंबई (वृत्तसंस्था):** यंदा जानेवारी ३० एप्रिलपर्यंतच्या ४ महिन्यांच्या कालावधीत विविध नैसर्गिक आपत्तीमुळे ५४ हजार ५३३ हेक्टर क्षेत्र बाधित झाले. त्यामुळे राज्यातील १ हजार शेतकऱ्यांनी आत्महत्या करून आपली जिवनयात्रा संपवली, अशी माहिती विधान परिषदेतील विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी बुधवारी दिली. त्यांनी यावेळी बाधित क्षेत्राचे पंचनामे करून शेतकऱ्यांना तातडीने नुकसान भरपाई देण्याची मागणीही केली.

अंबादास दानवे म्हणाले, मार्च २०२३ ते डिसेंबर २०२४ या कालावधीत झालेल्या विविध नैसर्गिक आपत्तीच्या नुकसानीपोटी शेतकऱ्यांना एकूण १३ हजार ८१९ कोटी रुपये वाटप होणे अद्याप बाकी आहे. सरकार पीक कापणी प्रयोगावर आधारित या एकाच निकषावर पीक विम्याची एकदाच भरपाई देणार आहे. हे अन्यायकारक आहे. आम्ही या विरोधात आवाज उचलणार आहोत. गेल्या काही दिवसांत राज्यातील विविध जिल्ह्यांवर मोठ्या प्रमाणात नैसर्गिक आपत्ती कोसळली. पण त्यानंतरही सरकार केवळ बघ्याची भूमिका घेत आहे.दानवे म्हणाले, राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार बीडचे पालकमंत्री झाले. पण त्यानंतरही तेथील गुन्हेगारी घटनांवर अंकुश लागला नाही. परळीमध्ये शिवराज दिवटे या तरुणाला मारहाण झाल्याचा व्हिडिओ व्हायरल झाला आहे. यामुळे तेथील कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न गंभीर झाल्याचे दिसून येत आहे.दानवे पुढे म्हणाले, केंद्राकडून महाराष्ट्र राज्याला २०२३ - २४ मध्ये ३६ हजार कोटींचा निधी मिळाला. तो २०२४ -२५ मध्ये ३१, ८३० कोटी रुपयांवर घसरला. त्यामुळे डबल इंजिन सरकारला केंद्राची साथ खरी मिळते का? असा प्रश्न उपस्थित होत आहे. सोलापूर एमआयडीसीत लागलेल्या आगीत जखमींना रुग्णालयात नेण्यासाठी पंढरपूरहून रूग्णवाहिका आणावी लागली. यावरूनही दानवे यांनी राज्यातील एकूण एमआयडीसींच्या सुरक्षा व उपाययोजनांबाबत ताशेरे ओढले.जनतेचा विरोध असताना ही विविध विकासकामांच्या नावाखाली सामान्य नागरिक व शेतकऱ्यांच्या जमीन अधिग्रहण करण्याचा प्रकार मोठ्या प्रमाणात सुरू आहे. राज्यात गुत्तेदारांचे साम्राज्य निर्माण करण्याचा प्रयत्न सरकारकडून होत आहे, असे ते म्हणाले.देशाचे सरन्यायाधीश भूषण गवई यांच्या राजशिष्टाचारात सरकारने निष्काळजीपणा केला. सरन्यायाधीशांनी स्वतः याविषयी नाराजी व्यक्त केली. त्यानंतर सरकारने पत्रक काढले. या चुकीवर पांघरूण घालून चालणार नाही. चुकीला माफी नाही.

## मुख्यमंत्री बैठक घेतायत अन् काही अधिकारी झोपलेत

# काही मोबाइल चॅटिंगमध्येच दंग-अजित पवारांनी सुनावले

• सह्याद्रीचा राखणदार

**मुंबई (वृत्तसंस्था):** इथे मुख्यमंत्री आहेत. दोन्ही उपमुख्यमंत्री आहेत. शेतकऱ्यांसाठी महत्त्वाच्या विषयावर बैठकीत चर्चा होत आहे. पण मी बघतोय की, काही अधिकारी खुशाल झोपले आहेत. काही मोबाइल चॅटिंगमध्येच दंग आहेत. हे काय चाललंय, अशा शब्दांत उपमुख्यमंत्री अजित पवारांनी कृषी विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना फटकारले.मुंबईत मंगळवारी राज्यस्तरीय खरीप आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. त्यास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, राज्याच्या मुख्य सचिव सुजाता सौनिक यांची उपस्थिती होती. अधिकाऱ्यांवर जरब असलेला नेता अशी अजित पवारांची ओळख कशामुळे झाली आहे, हे त्यांनी या बैठकीत दाखवून दिले.

कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांना खडसावत अजित पवार म्हणाले की, ही शेतकऱ्यांशी



संबंधित महत्त्वाच्या विषयावर बैठक आहे. या बैठकीला सर्व जिल्हाधिकारी, विभागीय आयुक्त, कृषी आयुक्त आणि केंद्र सरकारच्या संबंधित विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित आहेत. त्यामुळे कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांनी गांभीर्य दाखवावे. शेतकऱ्यांच्या मेहनतीमुळेच केंद्र व राज्य सरकार चालते हे लक्षात ठेवा.

गेवराई परिसरासाठी जालन्यात रेक पॉइंटची मागणी करण्यात आली. कृषी आयुक्तांनी सांगितले की, सध्या गेवराईसाठी रेल्वेकडून येणारे खत परळीतून घेतले जाते. पण गेवराईला जालन्याशी जोडण्याची गरज आहे. आष्टी , शिरूरसह इतर भागांसाठी रेक पॉइंट सध्या अहिल्यानगरला आहे. हमाल आणि वाहतूकदारांमधील संगनमतामुळे अहिल्यानगरला अधिक महत्त्व दिले जाते. ते मोडून मराठवाड्यासाठी स्वतंत्र रेकची व्यवस्था करावी.खतांच्या लिंकिंगची तक्रार सातत्याने येत असल्याचे सांगून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, आता प्रत्येक कृषी केंद्राच्या बाहेर बोर्ड लावून त्यावर फोन नंबर देण्यात येणार आहे. त्यामुळे लिंकिंगसाठी दबाव टाकला तर कारवाई केली जाईल. एखाद्या कृषी केंद्रांने पुरवठादार कंपनीसाठी लिंकिंग केल्याचे निष्पन्न झाल्यास अत्यावश्यक वस्तू कायदा किंवा तत्सम कायद्याच्या अंतर्गत त्यांच्यावर कारवाई केली जाईल.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.

Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .